# पोंभुर्णा तालुक्यातील नरभक्षक वाघाला त्वरित जेरबंद करावे- आ. सुधीर मुनगंटीवार

पोंभुर्णा तालुक्यात धुमाकुळ घालणा-या नरभक्षक वाघाला वनविभागाने तातडीने जेरबंद करावे अन्यथा भारतीय जनता पार्टी तिव्र जनआंदोलन छेडेल असा इशारा विधीमंडळ लोकलेखा समितीचे प्रमुख तथा माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिला आहे.

यासंदर्भात आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर वनवृत्ताचे मुख्य वनसंरक्षक व सर्व सबंधीतांना सुचना दिल्या आहेत. पोंभुर्णा तालुक्यातील कसरगट्टा, गंगापूर, बोर्डा बोरकर, घनोटी या गावांमध्ये गेल्या ८ दिवसापासून नरभक्षक वाघाचा धुमाकुळ सुरु आहे. या वाघाच्या हल्ल्यात आतापर्यंत ८ व्यक्ती जखमी झाले असुन दोन व्यक्ती मृत झाले आहेत. यामुळे पोंभुर्णा तालुक्यातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावकरी जीव मुठीत घेवुन जगत आहेत. सदर नरभक्षक वाघाला तातडीने जेरबंद करणे आवश्यक आहे. वनविभागाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. सदर वाघाला तातडीने जेरबंद करत नागरिकांना दिलासा देण्याची मागणी मा. सुधीर मुनगंटीवार

यांनी केली.

**सुधीर स. मुनगंटीवार**
विधानसभा सदस्य
समिती प्रमुख - विधीमंडळ लोकलेखा समिती
तथा माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)

जा.क्र. ६६५९६/ नोव्हेंबर/२०२१
दिनांक : २५.११.२०२१

प्रति,

मा. मुख्य वनसंरक्षक
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर

सप्रेम नमस्कार !

**विषय : पोंभुर्णा तालुक्यातील नरभक्षक वाघाला तातडीने जेरबंद करण्याबाबत.**

महोदय,

पोंभुर्णा तालुक्यातील कसरगट्टा, गंगापूर, बोर्डा बोरकर, घनोटी या गावांमध्ये गेल्या ८ दिवसापासून नरभक्षक वाघाचा धुमाकुळ सुरु आहे. या वाघाच्या हल्ल्यात आतापर्यंत ८ व्यक्ती जखमी झाले असुन २ व्यक्ती मृत झाले आहेत. यामुळे पोंभुर्णा तालुक्यातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावकरी जीव मुठीत घेवुन जगत आहेत. सदर नरभक्षक वाघाला तातडीने जेरबंद करणे आवश्यक आहे. वनविभागाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. सदर वाघाला तातडीने जेरबंद करत नागरिकांना दिलासा देणे अत्यंत गरजेचे आहे.

कार्यवाहीची रुपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

योग्य सहकार्याची अपेक्षा.

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

१. श्री. देवरावजी भोंगळे, भाजपा अध्यक्ष चंद्रपूर (ग्रामीण)
२. कु. अल्काताई आत्राम, सभापती, पंचायत समिती, पोंभुर्णा जि. चंद्रपूर
३. श्री. राहुलजी संतोषवार, जिल्हा परिषद सदस्य,
४. सौ. ज्योतीताई बुरांडे, उपसभापती, पंचायत समिती, पोंभुर्णा जि. चंद्रपूर
५. श्री. विनोदजी देशमुख, पंचायत समिती, पोंभुर्णा जि. चंद्रपूर

(S-213)
विधीमंडळ लोक लेखा समिती, विधानभवन, मुंबई - ३२
गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी : (कार्या.) ०७१७२-२५२५८२, फॅक्स : ०७१७२ - २५८८००,
७७२२०७४१९९, Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in, ajayd852@gmail.com, bjp03069@gmail.com 9552799608